SLCMS प्रणालीच्या अमंलबजावणीसाठी अतिरिक्त तांत्रिक समन्वयक (Implementers) उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०५२६/प्र.क्र.१८७/ ई-१६६५४००/प्रशा-२

९ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नविन गो.ते. संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१
तारीख : ०६ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनिमय भाग-२, दिनांक १७.०४.२०१५
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०६२४/ प्र.क्र.२५८/ प्रशा-२, दिनांक १४.०२.२०२५
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. डीएमईआर १५०३/ २०२६-ओ/ ओ-कमीशनर/ १५०८, दिनांक १३.०४.२०२६

प्रस्तावना:-

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/नर्सिंग/होमिओपॅथी तसेच भौतिक व व्यावसोपचार महाविद्यालयांमध्ये C-DAC या शासन अंगीकृत संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेली Student Life Cycle Management System (SLCMS) प्रणाली शासन निर्णय दिनांक १४.०२.२०२५ अन्वये कार्यान्वित करण्यात आली आहे.

सदर प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीदरम्यान विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/नर्सिंग/होमिओपॅथी महाविद्यालयांसाठी सध्या उपलब्ध असलेला एकमेव तांत्रिक समन्वयक (Implementer) अपुरा पडत असून, प्रणालीचा सातत्यपूर्ण वापर, वेळेवर डेटा प्रविष्टी व प्रमाणीकरण, वापरकर्त्यांचे प्रशिक्षण, तक्रार निवारण तसेच कार्यात्मक सातत्य राखण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यानुसार संचालनालयाने दिनांक १३.०४.२०२६ च्या पत्रान्वये पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या पाच विभागीय स्तरांवर प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ५ अतिरिक्त तांत्रिक समन्वयक नियुक्त करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने, SLCMS प्रणालीच्या अमंलबजावणीसाठी अतिरिक्त तांत्रिक समन्वयक (Implementers) उपलब्ध करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/नर्सिंग/होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये कार्यरत Student Life Cycle Management System (SLCMS) प्रणाली अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी C-DAC या शासन अंगीकृत संस्थेमार्फत पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या पाच विभागीय स्तरांवर प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ५ अतिरिक्त तांत्रिक समन्वयक (Implementers) नियुक्त करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रुपये ४९,५०,०००/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास लाख पन्नास हजार रुपये फक्त) (जी.एस.टी. शिवाय) इतक्या अंदाजित वार्षिक खर्चास वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

			(रक्कम जी.एस.टी. शिवाय)
तांत्रिक समन्वयक पदे	**प्रति पद मासिक दर**	**एकूण मासिक मानधन**	**एकूण वार्षिक मानधन**
५	८२,५००	४,१२,५००	४९,५०,०००

२. सदर अतिरिक्त तांत्रिक समन्वयक यांची नियुक्ती पूर्णतः कंत्राटी स्वरूपाची राहील व त्यांची नियुक्ती M/s. C-DAC, Noida मार्फतच करण्यात येईल. संबंधित मनुष्यबळाची निवड, नियुक्ती, वेतन अदा करणे, सेवा अटी, बदल/प्रतिस्थापन इत्यादी सर्व बाबींची जबाबदारी M/s. C-DAC, Noida यांची राहील.

३. सदर तांत्रिक समन्वयकांची किमान शैक्षणिक अर्हता MCA/B.Tech (Computer Science/Information Technology) किंवा तत्सम पदवी तसेच संबंधित क्षेत्रातील किमान एक वर्षाचा अनुभव अशी राहील.

४. नियुक्त तांत्रिक समन्वयक (Implementers) यांच्या प्रमुख जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील:-

अ) सातत्यपूर्ण ऑन-साईट व रिमोट सहाय्य पुरविणे.
ब) अंतिम वापरकर्त्यांचे नियमित प्रशिक्षण व क्षमता विकास करणे.
क) सदर प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या समस्यांचे सक्रियपणे निवारण करणे.
ड) SLCMS प्रणालीचा प्रभावी वापर, अचूकता व प्रशासकीय कार्यक्षमता सुधारणे.

५. सदर तांत्रिक समन्वयक यांचा कार्यकाल हा विभागामध्ये C-DAC द्वारे विकसित Student Life Cycle Management System (SLCMS) प्रणाली कार्यान्वित असेपर्यंत अथवा शासनाकडून पुढील आदेशपर्यंत लागू राहील.

६. नियुक्त तांत्रिक समन्वयकांचे, उपस्थिती, कार्यक्षमता व प्रणाली अंमलबजावणीचा आढावा आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय यांच्या स्तरावर नियमितपणे घेण्यात येईल.

७. सदर प्रकल्पाकरीता होणारा खर्च खालील नमूद लेखाशिर्षात उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक एस-०१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०१ - नागरी आरोग्य सेवा - विषमचिकित्सा राज्य योजनेंतर्गत योजना

(००) (०९) - वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयात आरोग्य सेवा

३० - इतर कंत्राटी सेवा (२२१० डी ९६२)

८. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७(२) "अ" अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०६१५३४५७५३५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.08.06 17:53:44 +05'30'

(म. गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (वै. शि.) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (वै. शि.) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७. संचालक, C-DAC, नवी दिल्ली.
८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.

९. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१०. सर्व अधिष्ठाता/वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/नर्सिंग/होमिओपॅथी महाविद्यालय.
११. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४. निवडनस्ती (प्रशासन-२)